
पारावरच्या गप्पा

# मजुरांच्या समस्येमुळे झालो हैराण; करायची तरी कशी शेती?



नित्यनियमाप्रमाणे गणपत देवदर्शन करून पारावर येऊन बसला होता. संपतही देवदर्शन करून कधी जवळ येऊन बसला हे गणपतला कळलेही नाही. गणपतच्या खांद्यावर हात ठेवत संपत म्हणाला, ''का रं गंपा, फारच विचारात दिसतोय? कसला विचार करतोय एवढा?''

त्यावर गणपत वैतागून म्हणाला, ''काही नाही रं संपा, चार दिवस झाले कपाशी खुरपण्यासाठी मजुरांच्या घरी चकरा मारतोय. आज येतो- उद्या येतो करत अजूनही ते यायचं नाव घेत नाहीत. पावसानेही यावर्षी फक्त डोकं ओलं करण्याएवढंच दर्शन दिलंय. इकडून तिकडून पाणी आणून कशी तरी कपाशी जगवली तर गवताने जोर केलाय. तणनाशक मारलं होतं; परंतु तरीही गवत काही हटलं नाही. आता मजुरांकडून काढून घेण्याशिवाय पर्याय नाही. मजूरही काही ठावठिकाणा लागू देईनात! उद्या येतो, असं म्हणतात आणि येतच नाहीत बघ. म्हणून विचार करत होतो की आता काय करायचं...?''

संपतलाही प्रश्न पडला आता गणपतची समजूत कशी काढावी त्याचा! कारण मजुरांचा प्रश्न खरंच गंभीर होत चालला आहे. परंतु त्यातून कसा मार्ग काढायचा याचं योग्य उत्तर संपतकडेही नव्हतं.

संपत म्हणाला, ''गंपा, तू म्हणतो ते अगदी बरोबर आहे बघ. मलाही हे प्रश्न आहेतच. कारण शेती करायचं म्हटलं तर मजुरांशिवाय होऊ शकत नाही. मजुरीचे दर तर दरवर्षी मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. बरं मजुरीचे दर वाढले तरीही त्या प्रमाणात काम होत नाही. मजूर वेळेवर येत नाहीत. पिकांचे नुकसान झाल्यानंतर मशागती करून काय उपयोग? खर्च तर होतो परंतु उत्पादनालाही फटका बसतो. रोजाने लावलेले मजूर लवकर येत नाहीत आणि आले तर तेवढे काम होत नाही. मजुरांना उक्तं काम लागतं. आपण शेतीच्या कामाचं नियोजन करावं आणि त्याचवेळी मजुरांची उपलब्धता होत नाही. या सर्व समस्या आहेतच बघ.''

गणपत आणखी वैतागला. ''कारं संपा, मग द्यायची का ही शेती सोडून? एकतर पिकाच्या उत्पादनाला दरवर्षी भाव ज्या प्रमाणात वाढले पाहिजेत त्या प्रमाणात वाढत नाहीत. दरवर्षी सरकार प्रत्येक पिकाच्या हमीभावामध्ये ५ ते ६ टक्के वाढवून देते. इकडे मजुरीचे दर दरवर्षी १० टक्क्यांनी वाढतात, नोकरदारांचेही पगार दरवर्षी १० ते १५ टक्क्यांनी वाढवून दिले जातात. शेतीमध्ये तर दरवर्षी खतं, औषधं, बियाणे, मजूर, मशागत यांचे दर तर मोठ्या प्रमाणात वाढतात. म्हणजेच उत्पादन खर्च कमीत कमी १० ते १५ टक्क्यांनी वाढतो तर हमीभाव मात्र ५ ते ६ टक्क्यांनीच वाढतात. अर्थात हमीभाव वाढूनही त्या किंमतीला विक्री होईलच याची गॅरन्टी नाही. म्हणजेच दरवर्षी आपली शेती १० टक्क्यांनी तोट्यात चालली! मग असं झालं तर शेती सोडून देणेच योग्य नाही काय? सरकार मोफत धान्य, स्वस्तात धान्य, दुपारचे जेवण मोफत याप्रकारे गरिबांसाठी योजना आणतं. यामुळे कसंही करून भुकेल्यांचं पोट भरण्याचं क्रियाकर्म शासन पार पाडतं असं नाही वाटत का तुला संपा? अर्थात हे सर्व शासनाने गरिबांना देऊ नये, असे माझे म्हणणे नाही. परंतु जे अन्नधान्य सरकार गरिबांना मोफत कमी भावात वितरित करते ते पिकविले कोणी? शेतकरीच पिकवितो ना ते? मग तोच संपला तर सरकार काय वाटणार? खरं तर ही बाब शासनाच्या लक्षात येत नाही काय? उत्पादकच संपला तर तुम्ही उत्पादन वाटणार कसं?

शेतीमालाचे भाव वाढू नये यासाठी अनेक उपाययोजना सरकार करतं; परंतु शेती तोट्यात जाऊ नये म्हणून शासनाकडून कोणताही पर्याय शोधला जात नाही याचं फार दु:ख वाटतं बघ संपा!''

दोघेही शांत होते, कारण दोघांचेही दु:ख आणि प्रश्‍न सारखेच होते.

संपत हळूच पुढे येत म्हणाला, ''हे बघ गंपा, आपण काही शेती सोडू शकत नाही... कारण आपणच जगाचे तारणहार, अन्नदाता, पोशिंदा आहोत अशा अनेक उपमा शेतकऱ्यांना देऊन बळीराजाचा बळी घेतला जातो. हे अनेक वर्षांपासून सुरू आहे. खरं तर मजुरांचा प्रश्‍न हा दिवसेंदिवस गंभीर होत जाणारा विषय आहे. कारण पुढची पिढी ही शेतात कष्ट करून पैसे कमविण्यापेक्षा दुसरा मार्ग शोधण्यासाठी जास्त प्रयत्न करते. आपली खरी समस्या आहे ती म्हणजे आपली पीक पद्धती आणि शेती करण्याची पद्धत! यामध्ये बदल करण्याची गरज आहे. कमीत कमी मजुरांमध्ये आपण कशाप्रकारे आणि कोणती शेती करू शकतो; तसेच या शेती पद्धतीमध्ये कोणत्या प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापरू शकतो, याचा विचार करूनच यापुढे शेती करावी लागेल. कारण सरकार काय मजुरांचे दर कमी करू शकत नाही किंवा गरिबांसाठीच्या कल्याणकारी योजनांना कात्री लावू शकत नाही. तसेच शेती उत्पादनाच्या भावातही फार मोठी वाढ करेल असे वाटत नाही. कारण सरकार फक्त ग्राहकांचाच विचार करते. ग्राहकांना स्वस्तात शेतीमाल कसा उपलब्ध होईल, शेतीमालाचे भाव कसे पाडले जातील याच्यासाठी त्यांच्याकडे अनेक उपाययोजना आहेत. फक्त शेती फायद्याची कशी होईल, यासाठी मात्र त्यांच्याकडे उपाययोजना नाहीत! म्हणून आपणच आपला आधार होऊन शेती कशाप्रकारे फायद्याची होईल यासाठी प्रयत्न करत राहायचा. आपल्याकडे म्हणतातच ना, की शेतकरी शेती फक्त मजूर, दुकानदार आणि सरकार यांच्यासाठीच करत असतो... शेतकऱ्यांना प्रत्येक जण लुटायला बसला आहे, असं आपल्या गावाकडं बोललं जातंच ना! मग 'आलीया भोगासी, असावे सादर' या उक्तीप्रमाणे आपण आपलं कार्य करत राहायचं.''

गणपत मध्येच म्हणाला, ''मग स्पष्टच सांग ना संपा, जोपर्यंत आपण संपत नाही तोपर्यंत शेतीला सोडायचं नाही. ज्यावेळी आपण पूर्णपणे कर्जबाजारी होऊ, त्याचवेळी शेतीला सोडून द्यायचं काय? मग आपल्या प्रपंचाचं काय? आपल्या मुलाबाळांच्याही काही अपेक्षा आहेत- स्वप्नं आहेत. त्यांचं काय करायचं? की तेही स्वाहा करायचं?''

यावर संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, यातून मार्ग काढायचा आणि पुढे जात राहायचं बघ. मजुरांवर कमीतकमी आधारलेली पीक पद्धती किंवा तंत्रज्ञान वापरणे हे आता आपल्याला करावंच लागेल. तणनाशकांचा पिकांमध्ये वापर वाढवावा लागेल. अर्थात योग्य तणनाशक योग्य वेळी आणि तणांच्या योग्य अवस्थेत वापरले तरच त्याचा फायदा होतो. आंतरमशागतीसाठी यांत्रिक पद्धतीचा अवलंब करावा लागेल. पिकाची काढणीही जेवढी शक्य होईल तेवढी यांत्रिक पद्धतीने करावी लागेल. ज्याप्रमाणे दुग्ध व्यवसायामध्ये मजूर मिळत नाहीत म्हणून आपण मुक्तसंचार पद्धत, मुरघास तयार करणे, मिल्किंग मशिन यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून मजुरीमध्ये ७० ते ८० टक्के कपात करू शकतो- तसंच काही आपण शेतीमध्ये करू शकतो का यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. आता हेच बघ, लाईट टिकत नाही... पाणी भरायला मजूर जातो... दिवसा लाईट नसेल तरी त्याची रोजंदारी मात्र सुरू... पाणी तर भरून होतच नाही! अनेकदा एक एकर पिकाला पाणी भरायला १००० ते १५०० रुपये लागतात. म्हणजे एका पिकाला चार-पाच पाणी दिले तर पाच-सहा हजार रुपये पाणी भरण्यासाठीच मजुरीला लागतात! याऐवजी ठिबकचा वापर करून पाणी दिले तर मजुरीमध्ये बचत होईल तसेच पिकालाही पाहिजे तेवढे, पाहिजे तेव्हा- मग रात्र असो की दिवस- केव्हाही पाणी देता येईल. यासारख्या प्रत्येक गोष्टीवर विचार करावाच लागेल. हे केलं नाही तर मग नुसतं यावर चर्चा करून किंवा रडत बसून आपण शेती करू शकणार नाही. कारण शेती काही सरकार करणार नाही की मजूरही करणार नाहीत. शेती ही शेतकऱ्यांनाच करावी लागेल. त्यामुळे आपण आपल्याकडे कोणकोणत्या गोष्टी आहेत, कोणकोणत्या गोष्टी नाहीत आणि कोणकोणत्या गोष्टींची समस्या निर्माण होऊ शकते; याचा विचार करून आणि त्यानुसार पीक घेऊनच शेती करावी लागेल. चल उठ आता. मजूर कामावर निघण्याची वेळ झाली. आज मिळाले मजूर तर घे कपाशीमधील गवत काढून.''

-हे ऐकून मग गणपत घाईघाईत उठून मजुरांच्या घराच्या दिशेने निघाला... **(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**